# अंबे गोंधळाला ये...

दोन अंकी स्वतंत्र नाटक

लेखक:
प्रल्हाद जाधव

पात्रे :
माया काळे (मजूर, ३६ वर्षे),
सुजाता काळे (मायाची मुलगी, ८ वर्षे),
मोतीराम काळे (मजूर, ४० वर्षे),
अंजली ढवळे (कार्यकर्ती,३० वर्षे),
रंगा खाकाळ (मुकादम, ३५ वर्षे),
भाऊ ढवळे (संपादक, ६५ वर्षे),
प्रकाश माणगावकर (व.पो.निरीक्षक,५० वर्षे),
प्रमोद जांभळे (हवालदार, २५ वर्षे),
राजमल तोगडिया (वकील,४५ वर्षे)
सुभाष राजे (इंजिनीयर,४० वर्षे),
(तसेच स्टेनो,भालदार, चोपदार,गुंड इ.)

अंक पहिला/ प्रवेश पहिला

(पडदा उघडतो. मुंबई! रंगमंचावर डावीकडील कोपऱ्यात विंगेला लागून ' पॅराडाईज हाईट्स ' या टॉवरचे बांधकाम सुरू आहे. टॉवरच्या पायातील 'पार्किंग कम स्टिल्ट'चा काही भाग स्टेजवर दिसतो. स्लॅबचे छत, वर गेलेले काही पिलर दिसतात. त्या इमारतीच्या बी-विंगमध्ये जाण्यासाठी बांधलेला कच्चा जिना दिसतो.

स्टेटच्या काहीसे मधोमध असणाऱ्या स्टिल्टमधील पत्र्याच्या शेडमध्ये एक मजूर -कुटुंब राहते. उभे-आडवे पत्रे, बांबू, लाकडी बल्ल्या असे साहित्य वापरून ती शेड तयार केलेली आहे. विटा-वाळूचा ढिग, कुदळ, घमेली-फावडी, शिगा असे साहित्य आजूबाजूला पडलेले. शेडच्या मागील भिंतीचा जो आडवा पत्रा आहे, त्यामागे मोरीवजा बाथरूम,अडगळीचे सामान ठेवले आहे अशी कल्पना.
शेडच्या समोर अंगणासारखी छोटीसी मोकळी जागा. त्या पुढील कोपऱ्यात विंगेला लागून, बांधकाम साहित्याच्या ढिगाऱ्यात रुजलेली, मोगऱ्याची एक जुनाट वेल. नजरेत भरणारी! मोगऱ्याला कळ्या आल्या आहेत.

पुढील बाजूने म्हणजे प्रेक्षकांच्या दिशेने आत येण्याची वाट. पत्र्याचे फाटक. सामानसुमान आणण्यासाठीही त्या वाटेचा उपयोग होतो. उजवीकडील विंगेला लागून आत 'सुयोग' ही मोडकळीला आलेली पाच मजली इमारत. अर्थात् ती दिसत नाही. तिच्यातही लोक नाईलाजाने रहात आहेत. तिकडे जाण्यासाठी प्रेक्षकांच्या बाजूने पुढून एक चिंचोळी वाट. 'सुयोग सोसायटी' मध्ये राहणारी अंजली त्या वाटेचा जाण्या-येण्यासाठी वापर करते.जिकडे प्रेक्षक बसलेत तो रस्ता. रस्त्याच्या बाजूने लाईटचा एक खांब. तो खांब आपल्याला दिसत नाही पण त्यावरील लाईटचा काही प्रकाश रंगमंचावर पडत असतो.

'पॅराडाईज हाइट्स'च्या हद्दीवर तिन्ही बाजूंनी पत्रे लावलेले आहेत. त्यामागे आणि अवतीभवती सर्वत्र लहान-मोठ्या इमारती उभ्या आहेत अशी कल्पना. सुयोग 'पॅराडाईज हाइट्स'ला लागूनच असल्यामुळे तिच्यातून इकडे खाली काय, काय चालले आहे ते दिसू शकते.

मोतीराम आणि त्याचे कुटुंबीय, म्हणजे पत्नी माया आणि मुलगी सुजाता गावी दुष्काळ पडल्यामुळे मोलमजुरीसाठी मुंबईत आलेले. (त्यांचे कपडे, भांडीकुंडी, एक छोटे स्टूल, एक मोडकी खुर्ची, एक बाकडे असा संसार दिसतो.)

मोतीराम 'वॉचमन कम मजूर' म्हणून काम करतो. मायाही बांधकाम मजूर म्हणून काम करते.सुजाता बाजूला महानगरपालिकेच्या शाळेत दुसरीत शिकते.

पडदा उघडतो.संध्याकाळ. दिवेलागण झाली आहे.   शेडवर प्रकाश एकवटतो.शेडमध्ये  एक बल्ब लागलेला. त्या उजेडात माया चुलीवर भाकऱ्या भाजत आहे. वय पस्तीस वर्षे, काळी-सावळी, तरतरीत. रापलेली अंगकाठी. सोशिक पण कणखर. पुढील कोपऱ्यात सुजाता मोगऱ्याला झारीने पाणी घालत आहे. थीम साँग सुरू आहे...)

: तुझी वाट तुला दिसेल
तुझी ताकद तुला कळेल
आपल्या असण्याचा अर्थ उमजेल
उठ आणि झेप घे ...
कवेत आकाश घेण्यासाठी
हो तयार,
फडकव झेंडा नवा
हाती घे पुन्हा दिवा
ललला लला लला ऽऽऽ
ललला लला लला ऽऽऽ
(उत्सुकता वाढवणारी, थोडी रहस्यमय पण तितकीच दिलासादायक अशी या गाण्याची थीम ट्यून गरजेनुसार अधूनमधून वाजत राहणार आहे.)
माया : ए पोरी, हिकडं ये जरा, त्यो डबा घे बरं. (ती लक्ष देत नाही) ए सुजे ऽऽऽ ऐकू येत न्हाय व्हय तुला?
सुजाता : (वय आठ वर्षे. नाकीडोळी छान, चुणचुणीत. हुषार. लाल रिबीन, दोन वेण्या.अजूनही शाळेच्या गणवेशात. तिला तो वेश आवडतो, शिवाय दुसरा चांगला ड्रेस तिच्याकडे  नाहीच... तावातावात बोलू लागते) नाव काय ठिवलंय तुमी माझं?
माया : आनि दुसरं काय, सुजाता!
सुजाता : मग सुजे काय, सुजाता बोलता येत नाही व्हय?
माया : तू शिकव मस्नी आता!
सुजाता : अंजलीताई म्हणती की चांगल्या घरात जन्माला आलेली मुलगी म्हणजे सुजाता, मं सुजे काय? सुजाता म्हण की!
माया : लय मास्तरकी करू नग. चुकलं माझं. लसूण कुठं ठिवलीय बघ, ठेचा करती जरा!
सुजाता : मी पाणी घालतीय मोगऱ्याला...कळ्या आल्यात बघ कशा सुंदर!
माया : दिसातनं धा येळ पाणी घालतीस, अशानं मरंल ना त्ये. त्यापेक्षा  हिकडं माझ्या हाताशी लाग की जरा!
सुजाता : मी नाय! मला नाचाची प्रॅक्टीस करायची हाय. आणि अभ्यासपण करायचा पडलाय अजून कितीतरी.
माया : लय बालिष्टर व्हनार हाय अभ्यास करून!
सुजाता : व्हनारच हाय.आणि आसं झोपड्यात नाय, चांगली माडीच्या घरात राहणार हाय मी.
माया : ती अंजली कायबाय डोक्यात भरविती तुझ्या आन् खुळी करती तुला. लय नादाला लागू नगं तिच्या, आपली औकात वळखून राहावं माणसानं!
सुजाता : कळती मला माझी औकात! आमच्या बाई शाळेत सगळ्या कार्यक्रमात घेतात मला. पुढच्या वर्षी मॉनिटर होणार हाय मी!

माया : बरं बरं लय शाणी झालीस ना तू! बा आला का बघ जरा, जेवायची येळ झाली.आंगदुखीची गोळी आणाया गेला त्यो तिकडच गायब झाला, कुठं तडफडलाय जणू!

सुजाता : येतील ते, तू नको काळजी करू. (हलके संगीत)

(पत्र्याचे फाटक ढकलून अंजली येते. वय तीस.स्मार्ट, चुणचुणीत, बुद्धिमान.जीनची पॅन्ट, कुर्ता. हातात फोन, भाजीची पिशवी.)

माया : बघा, शंभर वर्ष आविष्य हाय तुम्हाला अंजलीताई.

आत्ताच नाव घेतलं तुमचं. ए पोरी,ते स्टूल दे ताईना बसाया.

अंजली : नाही बसत नाही आता, मलापण स्वयंपाक करायचा आहे, बाबा वाट बघत बसले असतील. भूक  सहन होत नाही त्यांना आणि शिवाय औषधं घ्यायची असतात वेळच्या वेळी. जाताजाता फक्त हाक मारावी म्हटलं तुम्हाला.(सुजाताला) काय सुजातामॅडम, कसा काय चाललाय अभ्यास तुमचा?

सुजाता : आज अर्धा दिवस होती शाळा, उद्या सुट्टी.

अंजली : व्वा, मजा आहे तुझी!

सुजाता :आज नवी प्रार्थना म्हणायला शिकवलं बाईनी.

(उत्साहाने) आणि ताई?

अंजली : काय ग?

सुजाता : बाईनी सांस्कृतिक कार्यक्रमात घेतलंय मला.

अंजली : अरे वा, कोणता कार्यक्रम?

सुजाता : बाई नाच बसवतायत आमचा.

अंजली : व्वा,छान,कोणत्या गाण्यावर नाचणार आहेस तू ?

सुजाता : उद्या सांगणार आहेत पण काहीतरी 'गोंधळाचं गाणं' हाय असं म्हणत होत्या.

अंजली : (कौतुकाने) अरे व्वा, ग्रेट,अभिनंदन!

सुजाता : तुम्ही याल ना माझा नाच बघायला?

अंजली : अगदी नक्की.( मिश्कीलपणे) तू म्हणालीस तर नाचात भागसुद्धा घेईन मी तुझ्याबरोबर ! (पिशवीतून बिस्किटचा पुडा काढून देत) हे घे!

माया : काय हाय?

अंजली : काही नाही, बिस्किटचा पुडा!

माया : कशाला आणता ताई न्हेमी न्हेमी? जास्त लाड करू नका तिचे. डोक्यावर बसंल अशानं एक दिवस.

अंजली : काही बसत नाही,घे!

(मोतीराम हलकासा झुलत येतो. वय चाळीस वर्षे, सावळा, शिडशिडीत, काटक. बारावीनंतर पुढे शिकता न आलेला. स्वभावाने समंजस. खुरटी दाढी, मिशी. पॅन्ट,ओपन शर्ट.  चपला बाहेर काढून पिशवी मायाकडे देतो.प्यायलेला पण कंट्रोलमधे आहे.)

मोतीराम : (अंजलीला) रामराम अंजलीताई!

अंजली : रामराम!

मोतीराम : अग बसायला तरी देयाचं... (स्वतः स्टूल देत) टेका वाईच. सुजे, पाया पडलीस का ताईच्या?

अंजली : (सुजाताला जवळ घेऊन गोंजारत) अहो काय हे, असं जर काही शिकवलंत ना तिला तर परत कधी येणार नाही मी इथं.

मोतीराम : आसं कसं ताई, तुमच्यामुळं शाळा दिसली तिला, अभ्यासाची गोडी लागली, पाटी-पुस्तकं मिळाली,

शाळेची कापडं मिळाली, नाहीतर काय पाड लागणार व्हता ह्या एवढ्या मोठ्या शेहरात आमचा?

अंजली : माझं काही क्रेडिट नाही त्यात,आणि शिक्षण हा प्रत्येक मुलाचा हक्क आहे आता! (सुजाताला) भरपूर शिकायचं बरं का तू -

सुजाता : (तिचं वाक्य पूर्ण करत) आणि बॅरिस्टर व्हयाचं...

(सर्व हसतात )

अंजली : चला येते मी. पुण्याला जायचंय उद्या. मेळावा आहे आमचा, शिवाय इतरही नेहमीचे उद्योग आहेतच! लवकर बाहेर पडायचंय सकाळी ...

सुजाता : ताई तुम्ही पेपरात नोकरी करता ना?

अंजली : नोकरी कसली, घरचाच आहे पेपर. बाबा ऐकत नाहीत म्हणून करते त्याना थोडी मदत!

सुजाता : माझा फोटो छापाल का एक दिवस?

अंजली : अगदी नक्की!चांगला अभ्यास कर, नाचात बक्षीस मिळवून दाखव,मग छापीन, काय?

सुजाता : हो, नक्की मिळवीन मी बक्षीस ...

सुजाता : ताई?

अंजली  : काय ग?

मोतीराम : अगं किती तरास देशील,जाऊदे की त्यास्नी!

अंजली : (कौतुकाने) नाही, नाही, बोलू दे तिला. बोल!

सुजाता : तुमच्या खिडकीतली लाईट रात्रभर सुरू का असती हो?

अंजली : का र ण...(विचारात पडत) कारण रात्री मला चांदण्यांशी बोलायचं असतं.

सुजाता : चांदण्यांशी?

अंजली : हो. का?

सुजाता : पण चांदण्यांशी कसं बोलता येईल माणसाला?

अंजली : येतं बोलता. आपण त्यांच्याकडे बघत रहायचं, त्या लुकलुकतात, प्रकाश देतात, हे त्यांचं बोलणंच असतं आपल्याशी ...(सुजाता गोंधळलेली) पण तुला कसं ग माहीत माझी खिडकी उघडी असती ते?

सुजाता : हे बघा, इथनं दिसती ती! (मोजत) एक दोन तीन, तिसरा माळा ना तुमचा?

अंजली : अगदी बरोबर. आता मी घरी पोचले की आधी लाईट लावते...लाईट  दिसली की तू खालून हात दाखव मला,ओके?

सुजाता : हो ताई.( एव्हाना चांगला अंधार झाला आहे.

टॉवरच्या कच्च्या पायऱ्यांवरून टॉर्चचा प्रकाशझोत खाली येतो. टॉर्च फिरवत रंगा येत आहे. रंगा खाकाळ हा बिल्डरचा 'मॅनेजर-कम- मुकादम'. वय तीस वर्षे, पदवीधर. सिंगल फसली पण रगेल. गळ्यात सोनसाखळी, बोटात अंगठ्या. बांधकामावर लक्ष ठेवण्यापासून साहेबलोकांना सांभाळण्यापर्यंत सगळी कामं पार पाडण्याची जबाबदारी त्याची. मुकादम असला तरी साहेबाच्या टेचात वावरणारा. धोरणी पण तेवढाच रेम्याडोक्याचा. एका हातात पिशवी, दुसऱ्या हातात टॉर्च)

रंगा : मोतीराम ऽऽऽ वो ऽ मोतीराम ऽऽऽ

मोतीराम : जी मालक?

रंगा :(दमात घेत) पाचव्या माळ्यावरचा पाण्याचा टिंप रिकामा हाय ...

मोतीराम :(अपराध-भावनेनं) प्रेशर नव्हतं म्हणताना पाणी चढलं न्हाय वर आज...

रंगा : आर मग चार बादल्या हातानी न्हेऊन टाकायच्या... काय पाय मोडले असते का तुझे? (मायाकडे पहात) आन तू काय करतीस दिसभर बसून नुस्ती? चार घमेली इकडं तिकडं केली की झालं! हजेरी मात्र पूर्ण दिवसाची लावायची तुमची. जरा विचार करावा का नाय माणसानं? लाखो रुपयांचा खर्च आहे रोजचा पण टकुऱ्यात येत नाय तुमच्या...

मोतीराम : न्हाय पर...
रंगा : काय पर पर करतोयस ल्येका? तुम्हाला फुकटचं पोहोचायला बसलोय का आम्ही इथं?(मोतीराम गप्प)
...आणि चॅयला जरा दुष्काळ पडला की अख्खा मराठवाडा मुंबईत! (अंजलीकडे लक्ष जातं.थोडा नरमत) आर तुम्ही व्हय मॅडम? (स्टाईलने मुजऱ्यासाठी थोडा झुकत) वर फरशी बसवायचं काम सुरू हाय, पाणी नाय मिळालं तर काय क्वालिटी राहील कामाची तुमीच सांगा. आख्ख्या एरियात नाव हाय 'मेहता ॲण्ड मेहता कन्स्ट्रक्शन कंपनी'चं. पत्रे लागले त्या पहिल्याच दिवशी पूर्ण प्रोजेक्ट बूक झाला आमचा हे माहिताय तुम्हाला. येक-दीड वर्षात पझेशन देयाचं हाय; बसून चालंल का आम्हाला मॅडम?
अंजली: (त्याच्याशी बोलू इच्छित नाही.)
रंगा : मोत्याऽ
मोतीराम : जी मालक?
रंगा : जरा स्पीड वाढव उद्यापास्न...जीव लाव कामाला.
मोतीराम : जी मालक!
रंगा : (मायाला) आन् तू ग, एऽ
माया : (पटकन) जी मालक, भरते टिंप सकाळी.
रंगा : माझ्याकडनं हासडून घेतल्याशिवाय चालतच नाय तुमचं. (माया गप्प. मोतीरामला) आन् तू काय एकलाच नाहीस, पाच-पंचवीस मजूर राबतायत तुझ्या जोडीनं हे लक्षात ठेव, काय?
मोतीराम : जी मालक.
रंगा : (जाता जाता पिशवी पुढे करत) घे ऽऽ
मोतीराम : काय हाय?
रंगा : थोडं फरसाण आणि 'आंगदुखीचं औषध' हाय.घे!
(हसतो. 'अरे घे की ' म्हणत, बळेबळे पिशवी त्याच्या हातात कोंबतो.निघण्यापूर्वी दोन्ही हात जोडून अंजलीला नमस्कार करत) पन्नास वर्षं झाली तुमच्या ह्या 'सुयोग'ला. म्हातारी झाली ती आता. कवा कोसळून पडंल सांगता येत न्हाय...डेव्हलपमेंटला द्या आमच्याकडं, शंभर पिढ्या बसून खातील तुमच्या. म्हेताशेठ बोलले तुमच्या वडलांशी. त्यानी ठरवलं तर काहीही होऊ शकतं. पण ऐकत नाहीत ते. तुम्ही ट्राय करून बघा.(अंजली हेतूतः शांत) ... आमच्या ह्या टॉवरमधी चार फ्लोअरला मिळून एक स्वीमिंग पूल दिलाय आम्ही. अख्ख्या मुंबईत स्कीम नाही अशी दुसरी. दुबई - सिंगापूरपास्नं बुकिंग मिळालंय.दुनिया झुकती है झुकानेवाला चाहिये...(परत 'पायलागू पद्धतीने' अंजलीला मुजरा करत) विचार करून सांगा. तुमच्यासोबत काम करण्याचा 'सुयोग' जुळून यावा असं खूप दिवसापास्नं वाटतं मॅडम...( हसतो. पुढे जाऊन मागे फिरतो,सुजाताकडे पहात-) नाव काय तुझं बाळ?
सुजाता : सुजाता!
रंगा : गूड.( खिशातून एक चॉकलेट काढून देत) घे! (क्षणभर संगीताचा थरार) अगं घे की.चॉकलेट हाय. बुद्धिसाठी चांगलं असतं,पोटाला पण आधार असतो चांगला. घे,उद्या शाळेच्या डब्यात घेऊन जा हवं तर, नको? (पागल झाल्यागत हसतो) सालं ह्या शिनेमा-नाटकांनी जगणं कठीण करून टाकलंय आमचं.लहान मुलीला चॉकलेट देणारा मुकादम म्हणजे बलात्कारी नराधम असंच वाटतं सगळ्याना, थूत् तिच्या मायला! (असं म्हणत चॉकलेट तेथील स्टूलवर ठेवून हसत निघून जातो.काही क्षण तणावपूर्ण शांतता)
अंजली : चला, येते मी, उद्या लवकर निघायचंय. जेवून घ्या तुम्ही आणि आराम करा. बाऽऽय सुजाता...(असं म्हणत निघते. पुन्हा मागे फिरते, ते चॉकलेट उचलून एका अंतस्थ चिडीने रंगा गेला त्या दिशेने फेकून देते आणि गेटमधून बाहेर पडून झपाझप पाय उचलत सुयोगकडे निघते. (संगीत.)

माया : (मोतीरामला पाण्याचा तांब्या देत) हातपाय धवा आणि जेवायला बसा... (तांब्या देताना त्याच्या तोंडाचा वास आल्यानं खेकसत) आलात ना श्यान खाऊन आजपण?
मोतीराम : (त्याचा उद्रेक होतो) चॅआयचं बेणं तुझ्या, मला काय हौस हाय का? दिवसभर मेहनत करून दमून जातो म्या म्हनून घेतो थोडी. (शांतता)
सुजाता : आये?
माया : तुझं काय आता?
सुजाता : (सुयोगच्या तिसऱ्या माळ्याकडे स्वप्नाळू नजरेनं पहात) मलापण अंजलीताईसारखं बोलता येईल का ग?
माया : ऑ?
सुजाता : चांदण्यांशी बोलाया येईल मला अंजली ताईगत?
माया : अगं कशी ग वाण्याबामणाच्या  पोरांवानी कराय लागलीस तू? टकूरं फिरलंय का काय तुझं चांदण्यांशी बोलाया? चल घे भाकर!
सुजाता : (तिसऱ्या माळ्याकडे पाहत) ती बघ लागली लाईट ...
(वर खिडकीत लाईट लागते. तिकडून किरणांचा एक कवडसा सुजाताच्या चेहऱ्यापर्यंत पोचतो. ती अंजलीला हात हलवून दाखवत एका अंतस्थ प्रेरणेने दोन्ही हात जोडते आणि प्रार्थना म्हणू लागते.)
इतनी शक्ति हमें देना दाता
मनका विश्वास कमज़ोर हो ना,
हम चले नेक रास्ते पे हमसे
भूलकर भी कोई भूल हो ना...
(मोतीराम माया पाहतच आहेत. हळूहळू अंधार.)

अंक पहिला/प्रवेश दुसरा.

(प्रेक्षकांच्या उजवीकडे पुढील कोपऱ्यात प्रकाश येतो. वेळ रात्री नऊ-साडेनऊची. सुयोगच्या तिसऱ्या माळ्यावरील अंजलीच्या फ्लॅटमधील एक कोपरा. हे भाऊंचं म्हणजे तिच्या संपादक-वडलांचं,घरातलं ऑफिस. कोरीव लाकडाचं छोटं पार्टिशन. त्या लाकडी भिंतीवर एखादं कॅलेंडर, एखादं मानपत्र. टेबलावर कॉंप्युटर,काही स्मृतिचिन्हं, वीणावादन करणाऱ्या सरस्वतीचा छोटा पुतळा.  पेन-स्टॅंडमध्ये बरेच पेन-पेन्सिली,एखादं मोरपीस. या ऑफिसच्या म्हणजे प्रेक्षकांच्या उजव्या बाजूला एक खिडकी. तेथून डोकावून पाहिलं की खालची पत्र्याची शेड आणि तो परिसर दिसतो. रंगमंचाच्या मधोमध  दाराची एक चौकट. एकीकडे आत किचन, बेडरूम इत्यादी. दुसरीकडून म्हणजे हॉलमधील पार्टिशनच्या मागून घराच्या आत-बाहेर करता येते.भाऊंचं वय पासष्ट वर्षे.तेजस्वी व्यक्तीमत्व. पांढरेशुभ्र,लांब केस. खादीचा सदरा-पायजमा,जॅकेट.चष्मा.  गेली चाळीस वर्षे ते 'व्यासपीठ' हे दैनिक कुणाचाही मिंधेपणा न करता व्रतस्थपणे चालवत आहेत. त्यांचा आणि त्यांच्या पेपरचा माध्यमांमध्ये, नेतेमंडळींमध्ये दबदबा आहे. कॉम्प्युटरवर ते पेपरचा ले-आऊट चेक करत बसले आहेत. पेपर छपाईचं काम नवी-मुंबईतून होतं. भाऊ बऱ्याचदा तिकडच्या ऑफिसातून तर कधी घरून काम करतात. अंजली स्वयंपाक घरातून तांब्या-पेला घेऊन येते आणि तो टेबलावर ठेवत-)
अंजली : गेला का पेपर प्रिंटिंगला?
भाऊ : पहिलं पान ओके करून पाठवलंय आताच. तासभर वाट बघू आणखी एखादी बातमी येतेय का याची, मग प्रिंटिंगला सुरूवात करू. बोललोय मी रसाळांशी...
अंजली : रसाळकाका असले रात्रपाळीला की मग काही चिंता नाही...कशावर आहे अग्रलेख आजचा?

भाऊ : मुंबईतील जागांचे वाढते भाव!
अंजली : आवडता विषय आहे तो तुमचा!
भाऊ : फार मोठं कारस्थान आहे त्यामागं बिल्डर-लॉबीचं हे नीट समजून घे तू!
अंजली : हो हो, माहिताय मला ते सगळं,चला जेवायला बसूया.औषधं घ्यायची आहेत अजून तुम्हाला.
भाऊ : (खुर्चीवर मागे रेलत) कसा झाला तुझा पुण्याचा मेळावा? दिवसभर विचारायला वेळच मिळाला नाही.
अंजली : काही खास सांगण्यासारखं नव्हतं.
भाऊ : तरीही?
अंजली : फॅशन म्हणून जमल्या होत्या सगळ्या बायका असं वाटलं.
भाऊ : सगळं जगणंच फॅशनेबल होत चाललंय हल्ली,पण भाषण कसं झालं तुझं?
अंजली : अगदी खरं सांगायचं तर नीट सूर लागतोय असं वाटलंच नाही...म्हणजे मी जीव तोडून बोलत होते पण त्या बाया माझ्या भाषणापेक्षा आपापल्या मोबाईलमध्येच अधिक गुंग झालेल्या दिसल्या...आपल्या मदतीची कुणालाही गरज राहिलेली नाही, आपल्या आतला आवाज ऐकण्याची तर अजिबातच गरज राहिलेली नाही कुणाला असं वाटतं भाऊ हल्ली!
भाऊ : अगदी निगेटिव्ह बोलायला लागलीस आज एकदम, बिनसलंय का काही?
अंजली : नाही, तसं काही नाही... (शांतता)
भाऊ : बाहेरपण पडली नाहीस दिवसभर कुठं ती?
अंजली : असंच ...
भाऊ : असं कसं?
अंजली : खरंच काही कारण नव्हतं भाऊ ...
भाऊ : चाळीस वर्षे झाली मी पत्रकारिता करतोय त्याला. नुसता विषयांचाच नाही तर माणसाच्या मनातील विचारांचा वासही येतो मला हे विसरू नको! (ती गप्प) काय विचारतोय मी?
अंजली : (पुन्हा गप्प )
भाऊ : मिलिंद बोलला का पुन्हा काही?
अंजली : तो काय बोलणार आहे? आणि तो विषय संपलाय कधीच! मला नाही आवडत भूतकाळातली मढी उकरत बसायला! (शांतता)
भाऊ : दुसरं लग्न करायला मोकळी आहेस तू ...तसं स्वातंत्र्य दिलंय मी तुला!
अंजली : (विषय बदलण्यासाठी कोपऱ्यात जाऊन खिडकीतून खाली पहात) गेले कुठं हे लोक? कुणीच कसं दिसत नाही!
भाऊ : (जवळ जाऊन पाठीवर हात ठेवत) काहीतरी लपवतेयस तू माझ्यापासून अंजली!
अंजली : खरंच काही नाही भाऊ...(पुन्हा खाली डोकावत) दोन-तीन दिवसात सुजाताची भेट झाली नाही, चुकल्या चुकल्यासारखं वाटतंय!
भाऊ : ...बाप आहे मी तुझा अंजली! (संगीत) काय झालंय नेमकं?
अंजली : (नमतं घेत) फ्रस्ट्रेशन येणार असं वाटतंय पुन्हा. गोंधळ उडालाय डोक्यात नुसता ...
भाऊ : आय सी,पण गोंधळ कधी होतो माणसाचा? त्यानं जर नीट ऐकलं नाही आणि नीट पाहिलं नाही तर! तू कान आणि डोळे नीट उघडे ठेवून बघ आणि स्वतःच अनुभव घे!
अंजली : रोज रोज त्याच त्या बातम्या,कोर्टात गेलं तर तीच बकबक,महिलामुक्तीची तीच ती भाषणं ... काय हाती येतं या साऱ्यातून! हे आपलं जगणं नाहीच असं वाटतं हल्ली. काहीतरी चांगला उद्देश, निमित्त, सूर गवसायला पाहिजे आयुष्याला असं वाटतं भाऊ...
भाऊ : तुझाच प्रॉब्लेम नाही हा, अनेकांचा झालाय.नव्या युगाची देणगीच आहे म्हण ना ती!

अंजली : डम्पिंग ग्राउंड झालंय जगण्याचं, सगळा नुसता कचरा...काय खरं नि काय खोटं तेच कळत नाही.
भाऊ : पण आपणच तर सच्चेपणा आणू शकतो ना या जगण्यात? दुसरं कोण आणणार आहे?
अंजली : तेही खरंय तुमचं!
भाऊ : आणि सगळाच काही अंधार झालाय असं समजू नकोस.चांगल्या गोष्टीसुद्धा घडताहेत आजूबाजूला.चांगली माणसंही असतात समाजात. आपापल्या जागी ठामपणे उभी राहून  करीत असतात ती ... संख्येनं कमी का असेनात!
अंजली : (गप्प)
भाऊ : लक्ष लागत नसेल कामावर तर नीट फोकस करायला शिकलं पाहिजे... जीव लावायला शिकलं पाहिजे कामाला, गाडून घेतलं पाहिजे त्यात!
अंजली : तसा प्रयत्न चालूच असतो माझा पण तरीही काहीतरी हरवून बसतोय आपण, असं वाटतं हल्ली...
भाऊ : तेच सांगतोय मी, हरवलेलं शोधायचं म्हणजे झालं!
अंजली : म्हणजे?
भाऊ : आता माझंच घे! एखादी बातमी लिहून वाचकाला तसंच वाऱ्यावर सोडून देण्याचं पाप केलं का मी कधी? एखादी गोष्ट चुकीची होत असेल तर त्याविरोधात आवाज उठवणं महत्त्वाचं. अशा प्रत्येक घटनेची ओनरशीप घेता आली पाहिजे, जबाबदारी उचलून पार पाडता आली पाहिजे...(शांतता) याला मी जीव लावणं असं म्हणतो! आणि यातली गंमत एकदा कळली  की एक आयुष्य किती लहान आहे कामं करण्यासाठी, हेच उलट लक्षात येईल तुझ्या!
अंजली : करतेय मी प्रयत्न माझ्यापरीनं ...
भाऊ : नुसतं प्रयत्न करून चालत नाही.सर्वस्व पणाला लावायला लागतं. आतला चांगुलपणाचा स्वर कायम जिवंत ठेवायला लागतो... वेळ आली तर विषाचा प्याला ओठाला लावण्याची तयारी ठेवावी लागते-  सॉक्रेटिससारखी! वाटते तेवढी सोपी गोष्ट नाही ही,पण तुझ्यात आहे ती ताकद अंजली! (शांतता)
अंजली : (गप्प)
भाऊ : तू निराश झाल्याचं आवडत नाही मला, हे माहिताय ना तुला?
अंजली : मी समजू शकते भाऊ...आई गेली, मिलिंद सोडून गेला पण प्रत्येक वेळी मोठ्या हिमतीनं उभी केली तुम्ही मला.आपलं हे छोटंसं पण हे स्वतंत्र बाण्याचं दैनिक आणि त्यावर अवलंबून असणाऱ्या पाच-पंचवीस माणसांचा संसार हसतमुखानं सांभाळलात तुम्ही. किती वाद अंगावर ओढवून घेतलेत आणि किती लढाया लढल्यात त्याला तर हिशेबच नाही...(विराम)
भाऊ : माझं ऐक तू, लग्न कर दुसरं!
अंजली : (भेदकपणे) मला म्हणता दुसरं लग्न कर पण आईवेगळी मुलगी सांभाळताना आपण दुसरं लग्न करावं असा विचार इतक्या वर्षात, तुमच्या मनात तरी आला का कधी, सांगा! (संगीत)
भाऊ : माझं आता वय झालं अंजली. पिकलं पान आज ना उद्या गळून पडणार. माझ्यामागे दुसरं कुणीच नाही हा कारभार सांभाळायला.
अंजली : काय चाललंय हे भाऊ हे तुमचं?
भाऊ : (काही क्षण थांबून)  माझ्यानंतर हे दैनिक तुला चालवायचं आहे. वाढवायचं आहे.(हलकंसं संगीत) एकीकडून तुझी वकिली, तुझी एनजीओ, लेखन-वाचन चालूच ठेव पण दुसरीकडून पुन्हा नव्या संसाराचा डाव मांडायला काय हरकत आहे तुला? आणि या सुंदर जीवनाकडे पाठ फिरवण्याचा विचारही आणू नकोस कधी मनात! (हलकसं संगीत.ती  टेबलावरील 'व्यासपीठ'चा एक अंक उचलते, त्यावरून मायेने हात फिरवते, तो छातीशी कवटाळते आणि एकदम) चला जेवण थंड होतंय... (भाऊंचा फोन वाजतो. ते फोन घेतात)
भाऊ : हॅलो ऽऽऽ (प्रकाश बदलतो आणि फोनवरील संवाद मोठ्यानं ऐकू येऊ लागतो)

रंगा : नमस्कार भाऊसाहेब!
भाऊ : नमस्कार. कोण बोलतंय?
रंगा : खाकाळ बोलतोय, (अंजली ॲलर्ट) रंगा खाकाळ!
भाऊ : हं, बोला खाकाळ, काय म्हणता?
रंगा : दुसरं काय, तेच ते आपलं री-डेवलपमेंटचं...
भाऊ : एकदा सांगितलं ना जमणार नाही म्हणून!
रंगा : काल पुन्हा बैठक झाली म्हेताशेठकडं. 'चाळीस साठ' अशी ऑफर आहे आमची. डिपॉझिट म्हणून पन्नास लाख रुपये द्यायचं ठरलंय!
भाऊ : ठरलंय म्हणजे काय? आणि आमचा निर्णय घेणारे तुम्ही कोण? नाही जमणार...अजिबात नाही!
रंगा : काय ॲडजेस्टमेंट करायची आसंल तर म्हेताशेठ स्वतः येतो म्हणाले...
भाऊ : हे बघा खाकाळ, पुन्हा सांगतो, आम्हाला तुमच्या त्या री-डेवलपमेंटमध्ये काडीचा इंटरेस्ट नाही, समजलं?
रंगा : ठीक आहे पण विचार बदलला कधी तर जरूर कळवा... तुमचं वय झालंय आता आणि घरात एकुलती एक मुलगी आहे - तरूणपणातच नवऱ्यानं सोडून दिलेली, हे विसरू नका!
भाऊ : तुम्ही धमक्या देऊ नका हो मला,आयुष्य गेलं माझं अशा लढाया लढण्यात! (फोन बंद करतात)
भाऊ : (अंजलीला) ऐकलंस ना?
अंजली : फार घाणेरडा माणूस आहे तो.
भाऊ : या धंद्यात असलीच माणसं असतात अंजली. पैशासाठी कोणत्याही थराला जाण्याची तयारी असते त्यांची. (डोअरबेल वाजते) कोण आलं बघ. अंजली दार उघडते.घाबरीघुबरी झालेली माया आत येते)
अंजली : माया? आणि काय झालं, अशी घाबरलेली का?
माया : सुजाता शाळेत गेली ती परत आली न्हाय अजून!
अंजली : काय?
माया : व्हय.
अंजली : असं कसं होईल,रात्रीचे साडेनऊ झालेत आता. किती वाजता येते ती?
माया : साडेपाच सहालाच येती, पण प्रॅक्टिस व्हती आज नाचाची म्हणून येईल थोडी उशिरा आसं वाटलं...आता शाळेत जाऊन आलो आमी पर शाळा बंद हाय. काय करावं कळंना झालंय...
अंजली : आजूबाजूला शोध घेतला का?
माया : व्हय.
अंजली : मित्र - मैत्रिणीना विचारलं तिच्या?
माया : त्यांची तशी काहीच म्हायती नाय आमाला.
अंजली : (तयार होत) अरे बापरे! तू चल खाली, मी आले. पोलिस-कंप्लेंट करावी लागेल कदाचित. (माया जाते. भाऊंना) तुम्ही जेवण करून औषधं घ्या. मी जेवते आल्यावर. (निघत) वाकोल्याला माणगावकर म्हणून सिनियर पोलिस इन्स्पेक्टर आहेत,ओळखतात ते मला. पण तुम्ही एकदा असिस्टंट कमिशनर मिसाळ यांच्याशी बोलून घ्या म्हणजे गोष्टी सोप्या होतील पुढच्या.
भाऊ : बोलतो बोलतो,काही काळजी करू नको तू. वेळ आली तर गृहमंत्र्याच्या कानावर घालू आपण... आणि हे बघ, बातमीसाठी जागा ठेवतोय मी, काही असलं तर तसा फोन कर लगेच.
अंजली : (खिडकीजवळ येऊन खाली पहात काही अंदाज घेण्याचा प्रयत्न करीत आहे. खालून वर येणारा प्रकाश तिच्या चेहऱ्यावर.आजूबाजूला अंधार. ती जणू स्वतःशी बोलत आहे) सुजाता सुखरूप असेल ना? आणि ती अचानक अशी बेपत्ता

होण्याचं कारण तरी काय?... छे छे काहीतरी घोळ आहे...आणि  असं हातपाय गळाल्यासारखं का होतंय आपल्याला? डोळ्यांना नीट दिसू दे देवा,कानांना नीट ऐकू येऊ दे.बधिर संवेदनांच्या अस्ताव्यस्त पसरलेल्या या जाळ्यातून बाहेर पडून, नव्या चैतन्यानं, कुणाच्यातरी मदतीसाठी नव्यानं जगण्याचं बळ दे देवा!
(गाण्याचे शब्द ऐकू येऊ लागतात)
झाड  हिरवे स्वप्न देईल
सागर तुला हिम्मत देईल
चांदणं  होईल सुगंधी
वितळून जाईल अंधार सारा
आणि येईल प्रकाश नवा ...
ललला लला लला ऽऽऽ
ललला लला लला ऽऽ
(हळूहळू पूर्ण अंधार.)

* * *
अंक पहिला/ प्रवेश तिसरा.

(प्रकाश.सकाळ.साडेदहाची वेळ.रंगमंचावर डावीकडे टिपीकल पोलिसस्टेशन. टेबल-खुर्ची, समोर दोन खुर्च्या एक आडवे बाकडे. मागील पार्टिशनच्या भिंतीवर पोलिसखात्याचे बोधचिन्ह, बाजूला गुन्हेगारीचा चार्ट दर्शवणारा फळा.सिनिअर पी.आय. प्रकाश माणगावकर एक फाईल चाळत आहेत. अर्थात सुजाता प्रकरणाची. त्यांचा मोबाईल वाजतो. फोन त्यांच्या ए.सी.पी.साहेबांचा)
माणगावकर : नमस्ते सर, प्रकाश माणगावकर बोलतोय सर... हो सर, आय नो सर. परेड-ग्राऊंडवर समक्ष पहाणी केल्यावर झोनल ऑफिसात मीटिंग ठेवलीय होम मिनिस्टरांनी. हो कळवलंय सर्वांना,केलाय सर्व बंदोबस्त. हो सर,नो प्रॉब्लेम सर,ओके सर...काय सर? हो हो सर, जी सर! 'त्या प्रकरणी' एफ.आय.आर.दाखल करून घेतलाय सर. बघतो मी सर. काय सर? हो सर,जयहिंद सर!(फोन बंद करत) चॅयला ह्या बंदोबस्ताच्या ! एक दिवस निवांतपणा नाय.रात्री किती वाजतील घरी जायला परमेश्वराला माहीत. (त्यांचा सहायक असणाऱ्या हवालदार प्रमोद जांभळेला ते हाक मारतात) जांभळे ऽऽऽ
जांभळे : (येत सॅल्युट करत) येस सर?
माणगावकर : गाडी लावायला सांग ड्रायव्हरला!
जांभळे : जी सर!
माणगावकर : (तंद्रीतच) बायकोच्या वाढदिवसाला नवरा बंदोबस्ताच्या ड्यूटीवर!
जांभळे : काय म्हणालात सर?
माणगावकर : तुला नाय कळायचं ते, दरवर्षीची कटकट आहे साली.आज रात्री हातात घटस्फोटाची नोटीस ठेवली नाही तिनं तर मिळवलं! (नर्व्हस हसतो)
जांभळे : (उमजून) हॅपी मॅरेज ॲनिव्हर्सरी सर!
माणगावकर : ओ,थॅन्क्यू! उद्या वेळात वेळ काढून चहा घेऊ आपण.
जांभळे : धन्यवाद सर! (जांभळे घोटाळत उभा)
माणगावकर : मला निघायचंय जांभळे! (जांभळे तिथेच)
माणगावकर : काय रे, तोंड का केलंयस असं बाप मेल्यासारखं?

जांभळे : सर,बाहेर त्या ह्या आल्यात...
माणगावकर : ' त्या ह्या '? म्हणजे कोण, सासू माझी?
जांभळे : नाही.
माणगावकर : मग कोण?
जांभळे : अंजली बोरवणकर!
माणगावकर : चॅयला ह्या बयेलापण दुसरी काही कामं नाहीत काय रे आता? दौरा आहे होम-मिनिस्टरचा आज आपल्या एरियात हे माहीत नाही का तिला?
जांभळे : तसं सांगितलं मी त्यांना पण त्या म्हणतात, ए.सी.पी.साहेब बोललेत तुमच्याशी!
माणगावकर :(आठवून) चॅयची कटकट! पाठव तिला आत.
जांभळे : येस सर.
माणगावकर : आणि हे बघ?
जांभळे : (थांबत) जी सर?
माणगावकर : ड्रायव्हरला म्हणावं हलू नको गाडीपास्नं कुठं. लगेच निघायचं मला, मी उभाच आहे इथं... इडियट्स भरून ठेवलेत सगळे डिपार्टमेंटमध्ये! चल, तोंड काय बघतोयस माझं? (जी सर म्हणत निघतो.ते पुन्हा हाक मारतात) जांभळे!
जांभळे : जी सर?
माणगावकर : नवीन नोकरीला लागलायंस तू!
जांभळे : जी सर!
माणगावकर : कायम टेन्शनमध्ये असतो मी... एखादा वेडावाकडा शब्द गेला तोंडून तर वाईट वाटून घेऊ नको.
जांभळे : (गंभीरपणे) नाही सर...चांगला शब्द आला तुमच्या तोंडून तरंच वाईट वाटेल मला! (माणगावकर स्फोट झाल्यागत हसतात.जांभळेही मिष्किल स्मित करत बाहेर जातो.काही क्षणांनी अंजली येते)
अंजली : येऊ का सर?
माणगावकर : या या !
अंजली : हाऊ आर यू सर?
माणगावकर : आय ॲम फाईन. हाऊ अबाऊट यू?
अंजली : मी सुद्धा छान आहे. थँक्यू.
माणगावकर : बसा!
अंजली : बसत नाही, होम मिनिस्टरचा दौरा आहे तुमच्या एरियात आणि तुम्ही बंदोबस्ताच्या कामात बिझी आहात हे माहीत आहे मला.
माणगावकर : बरं वाटलं ऐकून... खरंतर धन्य झालो असंच म्हणायला पाहिजे...चहा घेणार?
अंजली : नो थॅन्क्स.
माणगावकर : बोला!
अंजली : दुसरं काय बोलणार?
माणगावकर : (स्वतःच) वाकोल्याला पॅराडाईज हाईट्सचं बांधकाम सुरू आहे. तिथनं एका बांधकाम मजुराची मुलगी बेपत्ता झालीय...
अंजली : नशीब,लक्षात आहे तुमच्या!
माणगावकर : तुम्हीच आला होतात त्या दोघाना घेऊन इथं तक्रार नोंदवण्यासाठी
अंजली : हो पण पुढं काय?

माणगावकर :(त्रासिक) व्हॉट डू यू मीन बाय 'पुढं काय'?

अंजली : शनिवार गेला, रविवार गेला आज बुधवार. चार दिवस झाले.(शांतता)...आणि मग एक दिवस 'कायम तपासावर' असा शेरा मारून फाईल बंद करणार तुम्ही... नेहमीची स्ट्रॅटेजी आहे ही तुमची.

माणगावकर : (तापत) इतकं सोपं नाही राहिलं ते आता. बाईवर अन्याय म्हटलं की संतापाची लाट उसळते देशभर. अख्खं पोलीस डिपार्टमेंट स्कॅनरखाली येतं.

अंजली : तेच म्हणतेय मी...भाऊंनी या प्रकरणाची जबाबदारी माझ्यावर टाकलीय. पुढे काय झालं हे वाचकांना कळावं म्हणून रोज काहीना काही बातमी द्यावी लागतेय मला...

माणगावकर : त्यात नवीन काय सांगताय?

अंजली : सगळ्या न्यूज चॅनलवर भाऊंचे विद्यार्थीच प्रमुख म्हणून काम करताहेत हे माहीत असेल तुम्हाला!

माणगावकर : अगदी व्यवस्थित!

अंजली : भाऊंची कामाची पद्धत आणि दरारा याचीही कल्पना आहे तुम्हाला!

माणगावकर : हो की, लोकमान्य टिळकांनतर तेच! ते मंत्रालयात गेले तर मुख्यमंत्री  रिसीव्ह करायला जातात त्यांना खाली!

अंजली : चेष्टा करत असलात तरी खरं आहे ते!

माणगावकर : मी काय करावं अशी इच्छा आहे तुमची?

अंजली : दुसरं काही नाही, या प्रकरणात नीट लक्ष घाला म्हणजे झालं!

माणगावकर : सांगितलं ना एकदा तक्रार नोंदवून घेतलीय म्हणून? आहे तपास सुरू...

अंजली : यू आर गोईंग बॅक टू द स्क्वेअर वन.

माणगावकर : (तडकत) मग काय करू, हुतात्मा चौकात उपोषणाला बसू का मोर्चा काढू स्वतःच्या डिपार्टमेंटच्या विरोधात? रोज दहा मुली गायब होतात मुंबईतनं.

अंजली : उद्याला चांगली हेडलाईन होईल ही आमच्या पेपरसाठी, छापू का? (शांतता) ए.सी.पी.चं प्रमोशन ड्यू आहे तुमचं साहेब. होम मिनिस्टरांच्या  टेबलावर आहे फाईल सहीसाठी...

माणगावकर : एखाद्याला कचाट्यात कसं पकडायचं हे चांगलं माहीत आहे तुम्हाला.

अंजली : वकीलपण आहे मी हे विसरू नका.

माणगावकर : हे बघा,आय विल ट्राय माय लेव्हल बेस्ट पण माझं करिअर बरबाद होईल असं काही करू नका!

अंजली : मला काही हौस नाही त्याची... फक्त एक निर्जीव  तक्रार म्हणून बघू नका ह्या प्रकरणाकडे इतकंच!

माणगावकर : तो  मेहता कसा माणूस आहे, हे माहिताय ना तुम्हाला?

अंजली : अगदी चांगलं ! नगरसेवक, आमदार, महापौर, मंत्री सगळे पे-रोलवर आहेत त्याच्याकडं.खोऱ्यानं पैसा ओढतोय तो. आता तर वाळू, सिमेंट आणि स्टीलसुद्धा सप्लाय करायला लागलाय... नोटा छापतोय नुसता! पण एक दिवस अंगाशी आल्याशिवाय राहणार नाही...सगळेच जातील मग आत!

माणगावकर : तुम्हीच सांगा मग कसा काय हात घालू  मी यात? कशी काय अपेक्षा बाळगताय तुम्ही माझ्याकडनं?

अंजली : कारण या सगळ्यांपेक्षा मी तुम्हाला जास्त ओळखते, कायद्याला जास्त ओळखते... अशा कितीतरी लढाया लढल्या आहेत तुम्ही जिद्दीनं आजवर,हे माहीत आहे मला चांगलं...(शांतता...पर्समधून एक बॉक्स काढून त्यांना देत) घ्या!

माणगावकर : काय आहे ते?

अंजली : काही नाही,मिठाई आहे...(पुढे करत) हॅपी मॅरेज ॲनिव्हर्सरी !

माणगावकर : मी कुणाकडून काही गिफ्ट घेत नाही हे माहीत आहे तुम्हाला.

अंजली : तुमच्यासाठी नाही, वहिनींसाठी आणलीय ती!  (टेबलावर ठेवते)

माणगावकर : जांभळेऽऽऽ

जांभळे : (येत) गाडी तयार आहे आणि ड्रायव्हर गाडीजवळच उभा आहे सर!
माणगावकर : (खुशीने हसत) होशील तू लवकरच तयार... आणि हे बघ -
जांभळे : जी सर?
माणगावकर : ह्या अंजली बोरवणकर.
जांभळे : नाव लक्षात राहण्यासारखं आहे...
माणगावकर : आपल्या बोरवणकर मॅडमचा काही संबंध नाही त्यांच्याशी.
जांभळे : (स्मित करत) आय नो सर!
माणगावकर : पत्रकार आहेत त्या.वकिलीपण करतात. शिवाय सोशल ॲक्टिव्हिस्ट आहेत.
जांभळे : अंजली म्हटलं की -
माणगावकर : (कोटी करत) जरा 'दमानिया' घे नाहीतर माहितीच्या अधिकारात जाशील आत!
(तिघेही मोकळेपणानं हसतात )
माणगावकर : (हातातली फाईल दाखवत) ह्यांची एक 'मिसिंग'ची केस आहे.
जांभळे : ते जोडपं आलं होतं परवा तीच ना?(आठवत) मोतीराम राजाराम काळे, माया मोतीराम काळे, मुलीचं नाव सुजाता?
अंजली : अगदी बरोबर.
माणगावकर : तपास-अधिकारी म्हणून मी काम बघायचं असे आदेश आहेत वरनं.
जांभळे : जी सर.
माणगावकर : पण ह्या कामात तू मला एक्स्क्लूजीव्हली मदत करायची!
जांभळे : जी सर!
माणगावकर : (हातातील फाईल जांभळेला देत) ही केस 'मुंबई पोलिस ॲप'वर रजिस्टर करून घे. नीट समजावून सांग यांना. शिवाय 'आधार' या एन.जी.ओ.कडंही कॉन्टॅक्ट कर लगेच. तेवढंच काम हलकं होईल आपलं. काय हवी नको ती मदत कर, समजलं?
जांभळे : येस सर!
माणगावकर : येऊ मी? मिनिस्टर यायच्या आधी मला पोचलं पाहिजे ग्राउंडवर. (एकदम तडकत) आणि कोणी उलथलंच तर फोन आहे माझा,कळलं?
(जांभळे 'येस सर' करत सॅल्युट मारतो. अंजली 'थँक्यू सर ' असं म्हणत जणू माणगावकरांना निरोप देते. ते ताडताड निघून जातात)
जांभळे : मॅडम, मोबाईल काढा तुमचा, (तो सांगतो तसं तसं ती करत जाते.उत्सुकता वाढवणारं संगीत.) ॲप स्टोअरमध्ये जा... 'आपली मुंबई' डाऊनलोड करा... इथं नाव टाका तुमचं...गूड! आता मोबाईल नंबर टाका! गुड्...(मोबाईलवर मेसेजचा 'टिंग' आवाज येतो) आला ना ओ.टी.पी.? टाका... कन्फर्म करा...ओके करा...पुन्हा एंटर करा... गूड आता ते हेल्पचं बटण दाबा.व्हेरी गूड. आता हा आपला एफ.आय.आर. नंबर टाका. (फाईलमध्ये बघून नंबर सांगतो) एमएसपी थ्री टू फोर एक ऑब्लिक टू झिरो नाइन, यूआरएससी डॉट फायू. टाकला? ओके. आता ' मुंबई पोलिस' असं टाईप करून डायलचं बटण दाबा. (ती तसं करत आहे) गूड. संपलं!(ती फोन टेबलावर ठेवते. तेवढ्यात तो मोठ्यानं वाजतो आणि आवाज येतो. )
आवाज : नमस्कार, मुंबई पोलीस आपल्या मदतीसाठी तत्पर आहे. सुजाता ममोतीराम काळे बेपत्ता प्रकरणी या ॲपवरून आम्ही आपल्याला सतत माहिती देत राहू! काळजी करू नका काळजी घ्या... सहकार्याबद्दल आपले आभार आणि शुभेच्छा!
('धन्यवाद जांभळेसाहेब' असं म्हणत अंजली उठते. जांभळे फाईल काखेत मारत तिला हलकेसे अभिवादन करतो. ती हा एकूणच प्रकार कौतुकानं पहात आहे...गाणं सुरू होतं...)
रानफूल विश्वास देईल

आभाळ देईल पंख
स्वप्नपाखरू गाणं गाईल
सुख बांधील घरटं ...
नवं जग निर्माण होईल
दुभंगून जाईल धरणी जेव्हा
ललला लला लला ऽऽऽ
ललला लला लला ऽऽऽ
हळूहळू अंधार )

अंक पहिला/प्रवेश चवथा

(प्रकाश येतो. पत्र्याची शेड. रात्री आठ - साडेआठची वेळ. उदासवाणं संगीत.मोतीराम, माया विमनस्कपणे बसली आहेत. पत्र्याचे फाटक उघडून टॉर्चचा प्रकाशझोत फिरवत 'मोतीराऽऽम ए मोतराम्याऽ ' असा आवाज देत रंगा येतो)
रंगा : लागला का पत्ता कुठं काही? तीन दिवस झाले... काय विचारतोय मी? लक्ष कुठाय तुझं?
मोतीराम : अजून काहीच खबर न्हाय मालक. (मायाचा डोळ्याला पदर, हुंदका.)
रंगा : (टॉर्चचा झोत इकडेतिकडे टाकून काहीतरी शोध घेत) धीर सोडू नका. वाईट वाटणं स्वाभाविक आहे, पण सापडंल ती.आमचापण शोध सुरू आहे सारखा. मेहताशेठ  बोललेत होम मिनिस्टरांशी. काळजी करू नका म्हणाले. स्पेशल टीम तयार केलीय पोलिसांनी शोध घेण्यासाठी. रात्रंदिवस फिरतेय ती मुंबईत. वाईट वाटतंय सगळ्यांनाच. पोटची पोर हरवल्यागत झालंय मला तर!
मोतीराम : (हात जोडत) लय म्हेरबानी झाली मालक. चित्त ठिकाणावर न्हाय.जेवणाखाण्याची शुद्ध न्हाय ऱ्हायली ...
रंगा : (एक पाकीट पुढे करत) म्हेताशेठनी दिलेत हे पैशे मदत म्हणून.पाच हजार आहेत.आणखी लागले तर मिळतील पण कामाला लागा आता असं म्हणाले, सारखं सुजाता सुजाता करीत बसलं तर बदनामी होतीय प्रोजेक्टची आपल्या, हे लक्षात घ्या, काय? (मोतीराम त्याला मूकपणे मान्यतादर्शक नमस्कार करतो.पाकीट घेऊन तिथंच स्टूलवर ठेवतो. रंगा पुन्हा इकडे तिकडे तसाच काहीतरी शोध घेत मध्येच एकदा मायाच्या अंगावरूनही  टॉर्चचा झोत फिरवून निघून जातो. दुसरीकडून अंजली सुयोगमधून खाली येते. येताना तिने या दोघांसाठी जेवणाचा डबा आणला आहे.)
अंजली : खाऊन घ्या थोडं. किती दिवस उपाशी राहणार? सापडेल, कुठं जात नाही ती. इन्स्पेक्टर माणगावकर स्वतः फिरताहेत सगळीकडे.काल शाळेत जाऊन तपास करून आले. फोनवरही मेसेजेस येत असतात माझ्या अधूनमधून. घ्या! (ती दोघानाही पोळी-भाजी काढून देते. पोळीचा एक तुकडा मोडून मायाला भरवते. तिच्या अश्रूंचा बांध फुटतो.)
माया : कुठं आसंल हो माझी पोर? काय करीत आसंल? जेवली आसंल का उपाशी आसंल माझी चिमणी? कोण्या जन्मीचं पाप केलं होत म्हणून हा भोग आला नशिबाला? तरी मी सांगत व्हती ह्याना की नको आपल्याला ती मुंबई, काय मरायचं ते गावी मरू, पर आईकलं न्हाई ह्यानी माझं. माझंच मेलीचं नशीब फुटकं. आता ह्या एवढ्या मोठ्या शेहरात कुठं शोधायचं माऊलीला माझ्या? (रडू लागते)
अंजली : उगाच नशिबाला दोष देत बसू नका.सापडेल ती नक्की! पेपरात फोटोसहित बातम्या छापून आल्यात. चॅनलवरूनही बातम्या सुरू आहेत.पोस्टर्स लागलीत सगळीकडं.सोशल मीडियावरूनही मेसेजस फिरताहेत सारखे.(देत) पाणी...( माया पाण्याचा एक घोट घेते. टॉवरच्या  पायऱ्यांवरून माणगावकर खाली उतरतात. लाईट ऑफ करून मोबाईल खिशात ठेवतात.)
अंजली : अरे माणगावकरसाहेब तुम्ही? असे अचानक?

माणगावकर : अचानक म्हणजे काय? आमच्या कामाची पद्धतच असते तशी... आणि तुम्ही आम्हाला बसून देणार आहात थोडंच? तुमच्या भाऊंनी तर अग्रलेख लिहिलाय आज. पोलिस डिपार्टमेंटची इज्जत काढलीय सगळी. 'तपास संपवून लगेच फास्ट ट्रॅक कोर्टात चालवा केस ' म्हणून मागणी केलीय सरकारकडं. तुमचा तो इलेक्ट्रॉनिक्स मीडिया तर लांडग्यासारखा मागं लागणार आता...

अंजली : पण तुमच्यात काही फरक पडतोय का त्यामुळं?

माणगावकर : तुम्हीपण त्यांच्या बाजूनंच बोलणार! (स्वतःशी) चॅयला, ढोलक्याला दोन्ही बाजूंनी थपडा!

अंजली : झाली का काही प्रगती? काही क्ल्यू?

माणगावकर : (टॉवरकडे पहात) प्रयत्न सुरू आहेत. एवढ्यात काही सांगता येत नाही. चॉकलेटचं रॅपर सोडलं तर काही हाती आलं नाही अजून.

अंजली : चॉकलेटचं रॅपर?

माणगावकर : हो, का?

अंजली : (विचारमग्न अवस्थेत) नाही, काही नाही!

माणगावकर : (मायाला अधिक चौकशीच्या दृष्टीने) तुम्ही शेवटची कधी बघितली होती सुजाताला?

माया : सोमवारी सकाळी शाळेत गेली ती परत आलीच न्हाय. दुपारी दोन वाजता आम्ही भाकरी खाया बसतो समदे... तवापण आली न्हाय म्हणताना शोधाशोध सुरू केली. रात्रीपण आली न्हाय मग तक्रार दिली.

माणगावकर : टॉवरमध्ये वर जायची का कधी?

माया : आम्ही तिला जाऊ देत नव्हतो,पायबीय घसरून पडंल या भीतीनं.

माणगावकर : नक्की?

माया : दोनचार येळा पाणी घेऊन आलिती माझ्यासंग इतकंच!

माणगावकर : पाणी?

माया : कधी कधी पाणी चढत नाय वर, मग एकेक बादली न्हेऊन भरावी लागती टाकी. मनात आलं तर करायची ती मदत मला.

माणगावकर : आय सी! (मोतीरामला) तुमचा संशय आहे का कुणावर?

मोतीराम : आता सौशय कुणावर घेणार साहेब, आणि कशापाय घेणार? भाबडा जीव तो, कुणाच्या अध्यात ना मध्यात, कोण शत्रू असणार तिला?

अंजली : रंगा खाकाळ म्हणून मुकादम आहे इथला त्याच्याशी तुमी बोललात तर आणखी काही माहिती मिळू शकेल...

माणगावकर : स्टेटमेंट घेतलंय मी त्याचं परवाच!

मोतीराम : हितं येऊन गेला त्यो आता.

माणगावकर : कोण? रंगा?

मोतीराम : हो.

माणगावकर : काय म्हणत होता?

मोतीराम : काही नाही, शेठनी पाच हजाराची मदत पाठवलीय म्हणाला, ते पैशे देया आला व्हता. हे काय पाकीट ठिवलंय हितं.

माणगावकर : (ते पाकीट उचलून ताब्यात घेत विचारपूर्वक) ठरवू आपण याचं काय करायचं याचं ते, मी विचारतो एसीपीसाहेबांना! ...काय म्हणत होता तो आणखी?

मोतीराम : काय नाय, इकडं-तिकडं केलं आणि गेला.

माया : साहेब -

माणगावकर : बोला ताई!
माया : नजर चांगली दिसत नाही मला त्याची.
माणगावकर : का वाटतं तुम्हाला असं?
माया : त्ये न्हाय सांगता येत,पर नजरेनंच वरबाडून घेतुया का काय आपल्याला आसं वाटतं त्याच्याकडं बघताना.
माणगावकर : वेळ आली तर कोर्टात सांगाल ना हे असं?
माया : जी व्हय... का पण?
माणगावकर : बायकोनं घटस्फोट दिल्यापास्नं जरा जास्तच वातरलाय तो.
मोतीराम : (आश्चर्याने) काय, बायकोनं सोडलाय त्याला?
माणगावकर : त्याच्या अड्ड्यावर जाऊन माहिती काढली सगळी...संध्याकाळी 'घेतली' नाय तर हातपाय थरथरायला लागतात त्याचे.
माया : तरी मला सौशय व्हताच. कवा कवा दिवसा पर पिऊन आसतंय त्ये!
माणगावकर : काळजी घ्या तुम्ही.( निघत अंजलीला) ओके अंजलीमॅडम, काही डेव्हलपमेंट असली तर कळवा मला, ऑफिसात पोचायचंय लगेच. होम मिनिस्टरांचा काहीतरी मेसेज आहे असं म्हणत होता जांभळे मघाशी. येऊ मी?
अंजली : हो साहेब.
(अंजलीचा मेसेज अपडेट वाजतो. मोठ्यानं आवाज येतो )
आवाज : नमस्कार! 'मुंबई पोलीस' आपल्याशी संपर्क साधत आहेत. कुर्ला रेल्वे स्थानकाजवळ रेल्वेलाईनच्या बाजूला एका अज्ञात मुलीचा मृतदेह आढळून आला आहे. वय अंदाजे आठ ते दहा वर्षे. रंग सावळा. संबंधितांनी ओळख पटवून घेण्यासाठी जेजे हॉस्पिटलमध्ये येऊन बॉडी पाहून पोलिसाना सहकार्य करावं ही विनंती!
(मन विदीर्ण करणारं संगीत. 'अरं माझ्या कर्मा' म्हणत कोलमडून पडणाऱ्या मायाला अंजली सावरते. माणगावकर मोतीरामला जवळ घेऊन धीर देतात.)
माणगावकर : घाबरू नका, ठीक होईल सारंकाही. काळजी करण्यासारखं काही नाही. शांत व्हा, शांत व्हा!
मोतीराम : (चिंताक्रांत) आता जो मेशेज आला तो?
माणगावकर : मला एक सांगा, सुजाता शाळेत गेली त्यावेळी आय-कार्ड होतं ना तिच्याकडं?
मोतीराम : जी व्हय.
माणगावकर : मग आता जी मुलगी सापडलीय तिचा उल्लेख 'अज्ञात'असा केलाय पोलिसांनी, म्हणजे ही सुजाता नसणार असा माझा अंदाज आहे.
मोतीराम : (हात जोडत) तुमच्या तोंडात साखर पडो साहेब.
माणगावकर : तसंच होवो पण तरीही आपण एकदा प्रत्यक्ष पाहून खात्री करून घेतलेली बरी. ही मुंबई आहे इथं कधीही काहीही होऊ शकतं.
मोतीराम : म्हजी कसं म्हणता साहेब?
माणगावकर : आमचाही अंदाज चुकतो कधीकधी!
माया : असं म्हणू नका साहेब! (पुन्हा ती मोठमोठ्यांनं हुंदके देत रडू लागते)
माणगावकर : हो पण त्यासाठी तुम्ही हिम्मत दाखवली पाहिजे ना? तुम्हाला असं वाटतं की मुंबईत हरवलेलं मूल लगेच दुसऱ्या दिवशी मोडका हात गळ्यात बांधून सिग्नलला 'गरीबोकी सुनो वो तुम्हारी सुनेगा' म्हणत भीक मागायला सुरुवात करतं... मुलगी असली तर थेट कामाठीपुऱ्यात 'इन्ही लोगो ने ले लिना दुपट्टा मेरा' म्हणत नाचायला सुरुवात करते! च्यायला त्या हिंदी सिनेमांच्या... चला! (सारे निघतात.अंधार होऊ लागतो. गूढ, रहस्यमय, उत्कंठावर्धक संगीत वाजू लागतं. काही क्षणांनी हळूहळू प्रकाश येतो. उत्तररात्र. पत्र्याची शेड. शेडवर मंद निळसर प्रकाश. मोतीराम बाहेर बाकड्यावर तर माया आत एक

फळकुटावर पाय पोटाशी घेऊन झोपलेली. हृदयाची धडधड वाढवणारे संगीत. टॉर्चचा झोत आणि त्या पाठोपाठ रंगा येतो. त्याच्यासोबत तोंडावर रुमाल बांधलेले दोन गुंड दहशत माजवत येतात, आल्याआल्या मोतीरामला ताब्यात घेतात. त्याचे हातपाय,तोंड बांधतात.मोतीराम सुटण्यासाठी धडपड करीत आहे पण त्या दोघांच्या ताकदीसमोर तो हतबल. रंगा आत घुसून मायाला खेचत बाहेर आणतो.)

माया : अरं कोण हाय, सोड सोड, काय करतोस, अंगाला हात लावू नको माझ्या, सोड, सोड...(रंग्याला ओळखून) तुमी व्हय मालक? आम्ही काय असं वाईट केलंय तुमचं म्हणून मागं लागलासा आमच्या?

रंगा : लय माज दाखवतीस ना, तुला दाखवतो आता हा रंगा काय चीज आहे ते!

माया : आवो पर आमी काय केलंय तुमचं वाईट? आमची पोर बेपत्त्या झाली ते दुख भोगतोय आमी आन वर तुमचा हा असा अत्याचार... कसं जगावं आमी?

रंगा : माझा संशय येतो ना तुला, माझी नजर चांगली नाय ना? मग आता तसंच वागलं पाहिजे आम्हाला तुमच्याशी. (पागलपणे तिच्या गालावरून आपली तर्जनी फिरवून ती जिभेने चाटत) अरे व्वा,अगदी मँगो आईस्क्रीमच की जणू!

माया : मुडदा बशिवला तुझा, अरं ही काय मोगलाई हाय का मनात येईल तसं वागाया? अरं धावा रं धावा कुणीतरी मदतीला, वाचवा, हो वाचवा... (सुयोगच्या दिशेने वर पहात) अंजलीताई, धावा हो धावा, हा राक्षस आब्रू लुटाया निघालाय माझी.

रंगा : (आता तिच्या दंडावरून बोट फिरवून ते चाटत) अरे व्वा, अगदी केशरपिस्ता आईस्क्रीमच की जणू. (अंजलीच्या फ्लॅटमधील लाईट लागते, तिकडनं प्रकाशाची एक तिरीप खाली येते. रंगा बेभान झालेला. तो मायाच्या पदराला हात घालून खेचत) आसं एक-दोन चमचे आईस्क्रीमनं भागत नाय, अख्खा फॅमिलीपॅकच लागतो आपल्याला!

(असं म्हणत तिला उचलून खांद्यावर घेत पायऱ्यांच्या दिशेने वर  निघतो. तोवर अंजली पत्र्याचे फाटक ढकलून आत आलेली आहे. ती पटकन पुढे जाऊन रंग्याला आडवत  पूर्ण ताकदीने त्याच्या थोबाडीत देते. तो हेलपाटतो, सावरतो... अंजली आपल्या डाव्या हातातील मोबाईल त्याला दाखवत) पोलिसांना कळवलंय, येतीलच ते आता  कोणत्याही क्षणी!

रंगा : च्यामायला तुझ्या, बघून घेईन एक दिवस. नाय तुझी कापडं काढली चारचौघात तर नाव सांगणार नाय रंग्या म्हणून! चला रे! (ते दहशत माजवत निघून जातात)

माया : (रंगा गेला त्या दिशेने पहात) माझ्या अंगाला हात लावलास,तळपट होईल तुझं, पुरं खानदान बरबाद होईल तुझं.अंगात किडे पडून मरशील भाड्या!

अंजली : (तिची समजूत काढत) शांत हो माया शांत हो. वेडा झालाय तो.अशा  चुका करून आपलीच केस स्पॉईल करतोय तो हे लक्षात घे.काळजी करू नको तू, त्याला फासावर चढवल्याशिवाय गप्प बसणार नाही मी. (ती मोतीरामचे हात पाय सोडते. तोंडावरची पट्टी काढते. थोपटून धीर देते. तो शरमिंदा झालेला.)

मोतीराम : (अपराध-भावनेनं तोंड हाताच्या ओंजळीत लपवत) मी काही करू शकलो नाय ताई, काही करू शकलो नाय, बुळ्यागत बसून राहिलो ताई.

अंजली : अशा परिस्थितीत काय करणार होतास तू? धीर सोडू नको. देव आपली परीक्षा घेतोय असं समजू आपण.

मोतीराम : तुम्ही नेहमी धीर देता आम्हाला, काळजी करू नका असं म्हणता. पण हे कळत नाही की हे आमच्या बाबतीतच असं का व्हावं सारखं सारखं? काय गुन्हा केलाय आम्ही कुणाचा? गरीब झाला म्हणून तो काय माणूस न्हाय? गरिबानं जगायचं न्हाय का? तुम्ही म्हणता देव परीक्षा घेतोय आमची पण अशा तऱ्हेनं परीक्षा घेऊन गोरगरीब माणसाला दुःखाच्या खाईत लोंटणाऱ्याला देव तरी कसं म्हणावं? (वर पहात) अरे एवढा मोठा शक्तीशाली देव आहेस तू तर मग जा आणि त्यांची परीक्षा घे जे लोकांवर जुलूम जबरदस्ती करत आहेत, त्यांची परीक्षा घे जे पावलोपावली भ्रष्टाचार करत आहेत, त्यांची परीक्षा घे जे लुटमार करीत आहेत, त्यांची परीक्षा घे जे मढ्याच्या टाळूवरचं लोणी खात आहेत, त्यांची परीक्षा घे जे दिवसाढवळ्या बायकांची अब्रू लुटत आहेत... पण कसा जाणार तू? तू तर आंधळा, मुका आणि बहिरा. तुला कान असून ऐकू येत नाही, डोळे असून दिसत नाही आणि तोंड असून बोलता येत नाही. तू तर दगड, स्वतःची अंघोळसुद्धा तुला स्वतःला करता येत नाही,

स्वतःचं खाणं खाता येत नाही,त्यासाठी पुजारी लागतो तुला, तू काय धावून जाणार दुसऱ्याच्या मदतीला? तू काय करणार गरिबाचं दुख दूर? कसा मानायचा तुला आम्ही देव, कशाला करायची तुझी भक्ती? (मान गुडघ्यात घालून रडू लागतो. एकदम प्रचंड कडकडाट  होतो. स्टेजवर अंधार. किंकाळ्या, पळापळ, सायरन. फायर ब्रिगेडच्या गाडीची घंटा. लोकांचा गलका. 'बिल्डिंग कोसळली, बिल्डिंग कोसळली'असे आवाज... काही क्षणांनी थोडा प्रकाश येतो. स्टेजवर  एक दोन पिलर कलंडलेले. विटा-मातीचा ढिग, धुळीचा मोठा ढग. प्रकाश थोडा वाढतो. ढिगाऱ्यातून  हळूहळू अंजली  वर येते. तिच्या हातात सुजाताचा मृतदेह. माया आणि मोतीराम धावत जाऊन अंजलीच्या दोन्ही बाजूला उभे. मोतीराम सुजाताचे डोके कुरवाळत तिच्या कपाळाचे मुके घेत आहे तर माया तिचे पाय आपल्या डोक्याला लाऊन  पाया पडून तिची  जणू माफी मागत आहे. साऱ्यांचा हृदय हेलावणारा आक्रोश. थीम साँग वाजू लागतं...)

उठ आणि झेप घे ...
तुझेच आव्हान तुला आहे
सळसळणारं रक्त तुझं
अजून बघ उष्ण आहे...
घे श्वास, उचल पाऊल
भविष्य घेऊन साथीला
अज्ञाताचा हात धरून
बेधडक चालत रहा
ललला लला लला ऽऽऽ
ललला लला लला ऽऽऽ
हळूहळू पडदा. मध्यंतर.)

***

सूचना :

- या नाटकाचा पहिला अंक येथे दिलेला आहे ज्यांना आवश्यकता असेल त्यांनी पुढील पत्त्यावर माझ्याशी संपर्क साधून दुसरा अंक प्राप्त करून घ्यावा.

- या नाटकाचे सर्व हक्क लेखकाकडे राखीव आहेत.प्रयोगापूर्वी लेखकाची परवानगी घेणे बंधनकारक आहे. या नाटकाचे  भाषांतर, रूपांतर, त्यावर आधारित चित्रपट, चित्रमालिका, वेब-सिरीज, अभिवाचन, यूट्युब-फेसबुकवरील (किंवा अशाच प्रकारच्या विद्यमान अथवा भविष्यातील नव्या माध्यमातून) पूर्ण किंवा अंशतः असा कोणत्याही प्रकारचा आविष्कार, चित्रिकरण, ध्वनिमुद्रण, प्रसारण इत्यादीपूर्वी लेखकाची पूर्व परवानगी घेणे आवश्यक.यासंदर्भात काही वाद उद्भवल्यास संबंधित कायदेशीर कारवाई मुंबई कार्यक्षेत्रात होईल!

**प्रल्हाद जाधव (९९२००७७६२६)**
pralhadjadhav.one@gmail.com

***